## स्थायी समिति
## दाखल विषय – दि. १९/५/२०२०

**विषय क्रमांक :– ११९ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांकरिता डाटा एन्ट्री ऑपरेटर यांची सेवा उपलब्ध करून घेतलेल्या सेवकांचे मागील वेतन अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माहिती व तंत्र/५७ दि. ६/५/२०२० चे पत्र.

१) मे.विद्या ऑनलाईन पुणे प्रा.लि. व मे.जेट सर्व्हिसेस यांना कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियमन १९७० अन्वये एप्रिल १९ ते जून १९ पर्यंतचे प्रति डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रति दिन दर रक्कम र. रू. ५०७=९२ व जुलै २०१९ ते सप्टेंबर २०१९ पर्यंतचे प्रति डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रति दिन दर रक्कम र. रू. ५०७=९२ या दराप्रमाणे दरमहाचे वेतन अदा करणेस,

२) वरीलप्रमाणे होणारा खर्च र.रु. ४६,२८,२८०/– माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील **RE11N103** सन २०१९–२०२० या अर्थशिर्षकावर खर्ची टाकून वेतन अदा करणेस.

**विषय क्रमांक :– १२० त्वर्य**

३२ दलली/दिन विठ्ठलवाडी मैलापाणी शुध्दिकरण केंद्र पाच वर्षे चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री विनय इंजिनिअरिंग सर्विसेस प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ५,८९,५१,३०६/– (प्रति वर्ष रक्कम रु. १,१७,९०,२६१/– प्रमाणे पाच वर्षे र.रु. ५,८९,५१,३०६/–) पेक्षा १३.२१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५,११,६३,८३८=४८ वस्तू व सेवा करासह अधिक विविध कायदे व नियमांनुसार सेवकांचे वेतनामध्ये होणारा फरक या नुसार होणाऱ्या रकमेपर्यंत पाच वर्षे काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/६४ दि. १८/५/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– १२१ त्वर्य**

कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत खराडी स.नं. ४, रक्षक नगर येथे तयार करण्यात आलेल्या विलगीकरण कक्षासाठी अतितातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क अन्वये निवासी साहित्य खरेदी व स्थापत्यविषयक केलेल्या खालीलप्रमाणे कामांची पश्चात माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/६५ दि. १८/५/२०२० चे पत्र.

१) कोरोना प्रतिबंधात्मक योजनेअंतर्गत स.नं. ४, रक्षक नगर, खराडी क्रीडा संकुल येथील विलगीकरण कक्षासाठी (दोन इमारती) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील निवेदनात नमूद माल ठेकेदार मे.सलीम construction व मे.साईराम construction यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क अन्वये खरेदी केलेल्या तसेच त्यांचेकडून स्थापत्यविषयक केलेल्या कामांसाठी त्यांचेशी करारनामा न करता व सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम भरुन न घेता ठेकेदार मे.सलीम construction यांचे र.रु. १०,०१,००९/– व ठेकेदार मे.साईराम construction यांचे र.रु. ३,००,४७१=९२ चे झालेल्या खर्चास,

२) कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली आरोग्य विषयक आणीबाणीची परिस्थिती आटोक्यात येईपर्यंत, आवश्यकतेनुसार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील निवेदनात नमुद माल पुरविणेचे काम त्याच दरानुसार वरील ठिकाणी अथवा त्याच परिसिरात इतरत्र ठेकेदार मे.सलीम construction व मे.साईराम construction यांचेकडून काम करुन घेणेस,

**विषय क्रमांक :– १२२ त्वर्य**

वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १३, ३१, ३२ व उत्तमनगर, शिवणे मध्ये विविध ठिकाणी पडीक हद्दीचे साफसफाई/झाडणकाम करणे टेंडर क्र. २१–२०१९ बाबत या कामाचे सर्वात कमी दराचे ठेकेदार मे.राजवीर एंटरप्राझेस यांचे निविदेस दोन महिने मुदतवाढ देण्याच्या अनुषंगाने खालील बाबींस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/६६ दि. १८/५/२०२० चे पत्र.

१) सदरचे काम हे आत्यावश्यक बाब म्हणून सध्याचे ठेकेदार मे.राजवीर एंटरप्राझेस यांचेकडून माहे एप्रिल २०२० व माहे मे २०२० या वाढीव कालावधीमध्ये त्यांचे निविदा दरानुसार (९.९०% जास्त) र.रु.१,१५,०९,४४४=०१ पर्यंत काम करुन घेणेस त्यानुसार संबंधित ठेकेदारास बिल अदा करणेस व सदर कामाचे बिल चालू आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या तरतुदीनुसार खर्ची टाकणेस,

२) सदर कामासाठी सन २०२०-२१ च्या उपलब्ध झालेल्या तरतुदीनुसार मागविण्यात आलेल्या निविदेस माहे मे २०२० पुर्वी मान्यता प्राप्त झाल्यास सदर निविदेस सर्वात कमी दराच्या ठेकेदाराकडून पुढील काम करुन घेणेस,

विषय क्रमांक :- १२३ त्वर्य

सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत पडिक हद्दीचे झाडण काम व स्वच्छतेचे काम आऊट सोर्सिंग पद्धतीने करणे टेंडर क्र. २३-२०१९ बाबत या कामाचे सर्वात कमी दराचे ठेकेदार मे.राजवीर एंटरप्राझेस यांचे निविदेस दोन महिने मुदतवाढ देण्याच्या अनुषंगाने खालील बाबींस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/६७ दि. १८/५/२०२० चे पत्र.

१) सदरचे काम हे आत्यावश्यक बाब म्हणून सध्याचे ठेकेदार मे.राजवीर एंटरप्राझेस यांचेकडून माहे एप्रिल २०२० व माहे मे २०२० या वाढीव कालावधीमध्ये त्यांचे निविदा दरानुसार (९.९९% जास्त) र.रु.१,०२,६९,३६९=२४ पर्यंत काम करुन घेणेस त्यानुसार संबंधित ठेकेदारास बिल अदा करणेस व सदर कामाचे बिल चालू आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या तरतुदीनुसार खर्ची टाकणेस,

२) सदर कामासाठी सन २०२०-२१ च्या उपलब्ध झालेल्या तरतुदीनुसार मागविण्यात आलेल्या निविदेस माहे मे २०२० पुर्वी मान्यता प्राप्त झाल्यास सदर निविदेस सर्वात कमी दराच्या ठेकेदाराकडून पुढील काम करुन घेणेस,

विषय क्रमांक :- १२४ त्वर्य

अंशदायी वैद्यकीय सहाय योजनेचे सभासद असलेल्या पुणे म.न.पा. आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांना कोविड बाधा झाल्यास वैद्यकीय उपचाराच्या खर्चाकरीता १००% प्रतिपूर्ती देणे व कोविड पॅनडॅमिक काळामध्ये अंशदायी वैद्यकीय सहाय योजनेची वर्गणी कपात न करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६८ दि. १८/५/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :- १२५ त्वर्य

**कोव्हीड १९.** महापालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी उपाययोजना अंतर्गत खालील नमूद बाबीस व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/कामगार कल्याण/६९ दि. १८/५/२०२० चे पत्र.

१. <u>कोव्हीड रुग्णालये</u>

पुणे शहरातील कोव्हीड १९ मुळे बाधित झालेल्या नागरिकांसाठी एकूण ९ खासगी रुग्णालयांसोबत पुणे महानगरपालिकेने करार (MoU) केला आहे. त्यामध्ये सिंबॉयोसिस, भारती हॉस्पिटल, सह्याद्री हॉस्पिटल, दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, राव नर्सिंग होम, नवले वैद्यकीय महाविद्यालय, बुधराणी हॉस्पिटल, पुना हॉस्पिटल व ग्लोबल हॉस्पिटल यांचा समावेश असून, त्यांना कोव्हीड हॉस्पिटल म्हणून घोषित करण्यात आले आहे. या रुग्णालयांमधून महापालिका अधिकारी/कर्मचारी यांना विनामुल्य उपचार घेता येईल. तसेच, भविष्यात ज्या रुग्णालयासोबत करारनामा करणेत येईल तेथेही मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या बाबी लागू राहतील.

२. <u>कंत्राटी कर्मचारी</u>

पुणे महानगरपालिकेतर्फे विविध विभागांनी कंत्राटदारांमार्फत कंत्राटी सेवकांच्या सेवा घेतल्या आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामावर असताना कोव्हीड १९ या विषाणूच्या संसर्गामुळे बाधित झाल्यास महानगरपालिकेतर्फे घोषित केलेल्या कोव्हीड १९ या रुग्णालयांमधून विनामुल्य उपचार घेता येणे शक्य आहे. तसेच, रुग्णालयांमध्ये दाखल झालेल्या दिनांकापासून ते डिस्चार्ज दिनांकापर्यंतच्या कालावधीचे त्यांना पूर्ण वेतन देणे प्रस्तावित करण्यास

३. <u>निवास व्यवस्था</u>

महापालिकेतर्फे कोव्हीड १९ चा संसर्ग रोखण्यासाठी विविध रुग्णालयांमधून उपचार करण्यात येत आहेत. या रुग्णालयांमधील कार्यरत वैद्यकीय अधिकारी व इतर सर्व सेवकांची आवश्यकतेनुसार निवासाची व्यवस्था हॉटेल्स, होस्टेल्स वा तदनुषंगिक ठिकाणी करण्यास

४. <u>सुरक्षा साधने</u>

कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव रोखणेसाठी महापालिका अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना ग्लोव्हज, मास्क, सॅनिटायजर, इत्यादी सुरक्षात्मक साधने पुरविणेबाबत यापूर्वीच सर्व संबंधितांना आदेशित करणेत आले आहे. तथापि, जास्त सुरक्षा साधनांची गरज असल्यास संबंधित खातेप्रमुख आणि महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी उपलब्ध करुन देण्यास

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.